# महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाअंतर्गत मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांना मानांकीत "स्कॉच SKOCH"पुरस्कार जाहीर.




भारताला एक चांगले व सक्षम राष्ट्र बनविण्यासाठी आपल्या कार्यामध्ये अभिनव कल्पनेसहीत कठोर परिश्रम घेणा-या व कामामध्ये मैलांची वाटचाल करणा-या संस्था तसेच प्रेरणादायी मार्गदर्शन व नेतृत्व करणा-या व्यक्ती यांना **"स्कॉच SKOCH"**पुरस्काराने सन्मानित करण्यांत येत असते. सार्वजनिक धोरण (Public Policy)या श्रेणीमधील सिल्व्हर स्कॉच पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग,ऊर्जा व कामगार विभागांतर्गत मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांना **INNOVATIVE METHOD TO ASCERTAIN LIFT MAINTENANCE AND PUBLIC SAFETY USING BLOCKCHAIN** या विषयावरील सादरीकरणास दिनांक २० मार्च २०२१ रोजी "सिल्व्हर स्कॉच" पुरस्कार जाहीर झालेला आहे.

कोव्हीड १९ च्या प्रार्दुभावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत उद्वाहनांचे निरीक्षण करुन उद्वाहने सुरक्षित रित्या कार्यरत असल्याची खातरजमा करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. ही प्रणाली कार्यान्वित करण्यास माननीय श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, ऊर्जा यांचे देखील प्रेरणादायी मार्गदर्शन मिळालेले आहे.

श्री.दिनेश ज.खोंडे,मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या अभिनव कल्पनेच्या आधारे सध्या राज्यात दिले जाणारे उद्वाहनाचे लायसन्स हे ब्लॉक चेन या तंत्रज्ञानाव्दारे दिले जात असुन अश्या प्रकारे उद्वाहनाचे लायसन्स देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

ब्लॉक चेन तंत्रज्ञानाव्दारे उद्वाहन लायसन्स दिल्याने सदर लायसन्सची सत्यता क्युआर कोड व्दारे कोणासही अगदी सहज पडताळता येते व आपण सुरक्षित उद्वाहनामधुन प्रवास करीत असल्याची खात्री सर्वसामान्याना होत असते.

वरील प्रशंसनिय व चांगल्या कार्याची दखल घेत ऊर्जा विभागाच्या मुख्य विद्युत निरीक्षक कार्यालयास मानांकीत **"स्कॉच पुरस्कार"** जाहीर झालेला आहे.